International Journal of Advance and Applied Research (IJAAR) | ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.065
Peer Reviewed Bi-Monthly | Vol.7 No.4 Mar – Apr 2020

# हिंगोली जिल्ह्याची भौगोलिक व लोकसंख्याविषयक माहितीचा अभ्यास

**प्रा. वसेकर एस.एल.**
नागनाथ कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, औंढा नागनाथ
ता. औंढा नागनाथ जि. हिंगोली

**डॉ. एस. एस. पतंगे**
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख
बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत, ता. वसमत जि. हिंगोली

**प्रस्तावना**

मध्य महाराष्ट्रात वसलेला पण पूर्व महाराष्ट्राला जवळचा हिंगोली जिल्हा १ मे १९९९ रोजी परभणी जिल्ह्याचे विभाजन करून निर्माण करण्यात आला. जिल्ह्याला प्राचीन धार्मिक आणि ऐतिहासिक पाश्र्वभूमी आहे. प्राचीन काळात विंगूली, विंगमुल्ह, लिंगोली असा उल्लेख हिंगोलीचा आहे. हिंगोली हे तत्कालिन वाशिम जिल्ह्यातील नसी परगण्यातील एक गाव होते. हिंगोली येथे निजामाने १९०३ मध्ये लष्करातील स्थापन केला. आजही हिंगोली शहरात फलटण, तोफखाना, पेन्शनपुरा, सदर बाजार, रिसाला बाजार, अश्वशाळा, गोलंदाज गल्ली, जिकर गल्ली अशा लष्करी छावण्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या वसाहतीचा उल्लेख आढळून येतो. हिंगोली जिल्ह्याचे क्षेत्रफळ ४८२७ चौ.से.मी. इतके असून त्यात हिंगोली, कळमनूरी, वसमत, सेनगाव आणि औंढा नागनाथ हे पाच तालुके आहेत.

**संशोधन समस्या**

संशोधन ही शिकण्याची, जाणून घेण्याची व प्रत्यक्षात करण्याची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेतूनच आपल्या आवती भोवती असणाऱ्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक व प्रशासकीय परिस्थितीविषयीचे अनेक घटक संशोधकाच्या मनात विविध प्रश्न व समस्यांचा काहूर निर्माण करतात. या प्रश्नांवर संशोधनाच्या चौकटीत राहून चिंतन करावे व त्यासाठी काही उपाय सांगावेत या दृष्टीने संशोधक विचार करतो. तेथूनच संशोधकाच्या मनात संशोधनाची इच्छा निर्माण होते. त्यामुळेच हिंगोली जिल्ह्याची भौगोलिक व लोकसंख्याविषयक माहितीचा अभ्यास हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये**

संशोधन समस्येचे विधान विषयी थोड्याफार प्रमाणात गोंधळ निर्माण होऊ शकतो. अशा प्रकारचा गोंधळ टाळण्यासाठी संशोधन समस्येचे नेमक्या शब्दात प्रतिपादन होणे गरजेचे असते. हे नेमकेपणा संशोधन प्रश्न, उद्दिष्टे परिकल्पना तसेच कार्यात्मक व्याख्यांच्या लिखाणाने येते. उद्दिष्टे संशोधकाला आणि प्रतिसादकाला जास्त सुस्पष्टता देतात. संशोधनाचा पाया उद्दिष्टे आहे. त्यामुळे ते संपूर्ण संशोधन प्रक्रियेला मार्गदर्शक ठरतात. उद्दिष्टांची यादी फारच लहान किंवा फारच मोठी नसावी. उद्दिष्टांच्या स्पष्टतेतून संशोधक नेमके काय शोधणार आहे याचे दिग्दर्शन होते. प्रस्तुत अभ्यास पूर्ण करण्यासाठी खालील संशोधनाचे उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

1. हिंगोली जिल्ह्यातील भौगोलिक परिस्थितीचा शोध घेणे.
2. हिंगोली जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणून घेणे.
3. हिंगोली जिल्ह्यातील लोकसंख्याविषयक माहितीचा अभ्यास करणे.

**संशोधनाचे महत्त्व**

राष्ट्र, राज्य, विभाग किंवा जिल्हा निर्माण होण्यासाठी भौगोलिक व लोकसंख्या घटकांची अत्यंत आवश्यकता असते. भौगोलिक आणि लोकसंख्ये शिवाय कोणतेही राष्ट्र, राज्य किंवा जिल्हा अस्तित्वात येऊ शकत नाही. तसेच तेथील भौगोलिक घटकांमध्ये हवामान, मृदा, नदी प्रणाली आणि लोकसंख्येमध्ये संख्यात्मक आणि गुणात्मक घटकांचा विकासावर परिणाम होत असतो. हिंगोली जिल्ह्याचा भौगोलिक व लोकसंख्येचा अभ्यास करण्यासाठी संशोधन विषयाचे महत्त्व अनन्य साधारण असेच आहे.

**संशोधन पध्दती**

संशोधन हा इंग्रजी भाषेतील Research या शब्दाचा पर्यायी शब्द आहे. इंग्रजी शब्दकोषापासून 'संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञान शाखेत नवीन तत्त्वे अथवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तत्त्वे यांचे पुन्हा-पुन्हा परिक्षण करण्यासाठी केलेला चिकित्सक व पद्धतशीर अभ्यास होय.' प्रत्येक अध्ययन विषयात ज्या संकल्पना, सिद्धांत निष्कर्ष स्वीकृत झालेले आहेत. त्यांचे प्रामाण्य पुन्हा-पुन्हा तपासून पाहणे हे त्या अध्ययन विषयांच्या अभ्यासकांचे कार्य आहे. जे सिद्धांत विभिन्न शास्त्रात प्रस्थापित झालेले आहेत. त्याची विश्वासार्हता तपासून पाहणे हे संशोधकाचे कार्य आहे. संशोधनामुळे मान्य झालेल्या नवीन तथ्यांच्या आधारावर प्रस्थापित ठरलेल्या सिद्धांतांत काही बदल करण्याची आवश्यकता स्पष्ट झाली तर अशा सिद्धांताची नव्याने मांडणी करण्यासाठी संशोधनाची गरज पडते. अशा प्रकारे संशोधन हा सतत सत्याचा शोध घेण्याचा एक व्यवस्थित व संघटित प्रयत्न आहे. प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक, वर्णनात्मक, विश्लेषणात्मक आणि सांख्यिकीय संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे.

**हिंगोली जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी**

मराठवाडा विभाग हा राज्य पुर्नरचनेच्या पूर्वी हैद्राबाद संस्थानात होता. परभणी जिल्ह्याचे विभाजन होऊन १ मे १९९९ साली हिंगोली जिल्ह्याची निर्मिती झाली. इ.स. १८०३ साली मराठा-टिपू सुलतान यांच्यामध्ये युद्ध झाले व इ.स. १८५७ मध्ये नागपूरकर भोसले लढाई या भागातील जनतेने जवळून पाहिली आहे. मराठी सेनेने इंग्रजांशी केलेल्या यशस्वी प्रतिकाराची येथील जनता साक्षी आहे. 'हिंगोली येथे लष्करी छावणीमुळे हे शहर पूर्वीपासून हैद्राबाद राज्यात एक महत्त्वाचे शहर म्हणून प्रसिद्ध होते.' एकेकाळच्या हिंगोलीचे स्वरूप एका कसब्यासारखे होते, तर नर्सी नामदेव परगण्यात हिंगोलीचा समावेश होता. पवित्र असलेल्या कयाधू म्हणजे आंतरबाह्य काया धूराणी तसेच आंतरबाह्य मनाला कार्यप्रवण करणारी कयाधू नदी ही आजही खळखळ वाहत असून तिच्या तीरावार हे शहर वसलेले आहे. औंढा नागनाथ सारख्या (हिंदुस्थानातील १२ ज्योर्तिलिंगापैकी आठवे ज्योर्तिलिंग) तर संत नामदेवाचे जन्मस्थळ नर्सी नामदेवांमुळे सर्वकष दृष्टिकोनातून प्रसिद्धीस असलेला भाग म्हणून ओळखला जातो.

इ.स.च्या नंतर १५८३ पर्यंत गोदावरी नदीच्या उत्तरेकडील नांदेड, परभणी जिल्ह्याचा भाग व हिंगोली परिसर हा विदर्भाचा अविभाज्या घटक होता. अगस्ती ऋषीच्या आगमनाने या परिसरात आर्य संस्कृतिचा प्रवेश होऊन हिंगोली व आजुबाजुच्या प्रदेशात आर्य संस्कृतीचा प्रवेश होऊन हिंगोली व आजुबाजुच्या प्रदेशात आर्य व अनार्य संस्कृतीचा उदय झाला. अनार्यांनी शिवशक्तीची उपासन त्यावेळीच सुरू केली. याचे इतिहासात पुरावे आहेत. ते मथूरा जनपदातून आले होते. हटकर समाज ही १२ शतकात नाशिकाडून आले आणि येथेच स्थायिक झाले. आंध आदिवासी तर मुळेच येथील रहिवासी आहेत. मोगलच्या फौजाना रसद पुरवठा करणारा बंजारा समाज ढोरासमावेत तांड्याचा ठिµया मांडून रहिवाशी झाला. तर अनुसूचित जातीमधील त्यावेळेस महार म्हणून संबोधिल्या जाणारे इ.स. पूर्वी सोमवन, लाडवन, आंधवन आदि प्रदेशातून आलेल मुळचे नागवंशी येथेच वास्तव्यास आले. १३ व्या शतकात मुसलमान येऊन स्थायिक झाले. तर जैन, कोमटी, गुजराथी, कच्छी आदि व्यापारी पेशातील मंडळी येथे मोठ्या प्रमाणात येऊन स्थायिक झालेली आहे.

नृसिंहाने हिरण्यकश्यपचा वध गोमतीच्या परिसरातच केला. गोमती नदी ही कयाधूला नरसी नामदेव येथे येऊन मिळते. कयाधू प्रल्हादाची आई व हिंगोली तालुक्यातील मोठी नदी आहे. नरसी येथे जुने नरसिंहाचे मंदीर आहे. भागवत धर्माची पताका पंजाबपर्यंत फडकविणाऱ्या लोककल्याणकारी संत नामदेवाची समाधी, त्यांचे जन्मस्थान व त्याकाळी ज्या घरात त्यांचे वास्तव्य होते ते घर आणि संत नामदेव ध्यानस्त बसत होते ती छोटीशी तळयासारखी जागा आजही नरसी येथे आहे. नाथपंथाचे गुरू गोरखनाथ, गहिनीनाथ व महानुभाव पंथाच्या चक्रधर स्वामींनी हिंगोली व परिसरात भ्रमंती करून वास्तव्य केल्याची नोंद आहे. संत नामदेवाचे गुरू श्री विसोबा खेचर यांचे जन्मस्थान औंढा नागनाथ आहे. भास्कर भट्ट, त्रिविक्रम, निंबराज, राजशेखर आदि संतकवी याच परिसरात अजरामर होऊन गेले. संत नामदेवांनी आपल्या भक्तीच्या बळावर औंढ्याच्या नागनाथाचे पश्चिमेकडे मुख करण्यास भाग पाडून व संपूर्ण देवालयच पश्चिमभिख केल्याने त्यांच्या संत श्रेष्ठत्वाची साक्ष पटण्यासारखी आहे. अशाप्रकारे हिंगोली जिल्हा हा संतांची भूमी म्हणून ओळखला जातो.

**भौगोलिक स्थान व क्षेत्रफळ**

मराठवाडा विभागातील हिंगोली जिल्हा राज्याच्या अग्नेय भागात वसला आहे. हिंगोली जिल्ह्याच्या पूर्वेस यवतमाळ, दक्षिणेस नांदेड व परभणी, उत्तरेस वाशिम जिल्ह्यांचा समावेश होतो. हिंगोली जिल्हा १९.०५ उत्तर ते २०.५ उत्तर या अक्षांशावर आणि ७६.३० पूर्व ते ७७.३० पूर्व या रेखाशांच्या दरम्यान पसरलेला आहे. जिल्ह्याचे क्षेत्रफळ ४८२७ चौ.कि.मी. असून ते महाराष्ट्राच्या क्षेत्रफळाच्या तुलनेत १.६०% एवढे आहे. हिंगोली जिल्ह्यात अजिंठा पर्वताची एक रांग आहे. ही रांग जिंतूर, हिंगोली, औंढा नागनाथ आणि कळमनुरी या तालुक्यात पसरलेली आहे. या रांगेमुळे जिल्ह्याच्या उत्तरेकडे एक पठार तयार झाले आहे. या पठाराची समुद्रसपाटीपासून उंची ५०० मी. आहे. माळहिवरा परिसरामध्ये ती ५९८ मी. पर्यंत उंच आहे. वसमत परिसरात ती काही ठिकाणी ४०० मी. पर्यंत खाली आली आहे. जिल्हा दख्खन पठारावरील महाराष्ट्राच्या पूर्व भागातील उपविभागाचा भाग आहे. जिल्ह्याचा भाग गोदावरी खोऱ्यात येत असला तरी पैनगंगा खोऱ्यातील कयाधू, पूर्णा या उपखोऱ्या समावेश होतो. जिल्ह्याच्या सर्व भागास डेक्कन ट्रॅप या नावाने ओळखले जाणारे बेसॉल्ट खडकाचे आडवे पसरलेले थर दिसतात. महत्त्वपूर्ण मानले जाणारे खनिजे दिसून येत नाहीत. जिल्ह्यात एकूण ५ तालुक्याचा समावेश आहे.

हवामान

हिंगोली जिल्ह्यांचे हवामान सर्वसाधारणपणे उष्ण व कोरडे आहे. पावसाळयात ते उष्ण व दमट असते. जून पासून सुरू होऊन सप्टेंबरच्या अखेरीस संपणाऱ्या पावसाळयाव्यतिरिक्त इतर काळात जिल्ह्यातील हवामान मुख्यत: कोरडे असते. जिल्ह्याचे सरासरी पर्जन्यमान ८२४.३९ मि.मि. असून २०१३ यावर्षी ११२१.८९ मि.मि. इतका पाऊस झाला आहे. हा प्रदेश उष्णकटीबंधात येत असल्यामुळे उन्हाळयात कडक असतो. मे महिन्यात सर्वाधिक तापमानाची नोंद होते. जिल्ह्यात डिसेंबर ते फेब्रुवारीपर्यंत हिवाळा असून मार्च ते मे पर्यंत उन्हाळा असतो. मे महिन्यात कमाल तापमान ४५ सेल्सिअस तर जानेवारी महिन्यात किमान १२.६ सेल्सिअस नोंदले जाते.

**नदी प्रणाली**

जिल्ह्यातून कयाधू, पूर्णा आणि पैनगंगा या नद्या वाहतात. पैनगंगा नदी अजिंठा डोंगरातून बुलढाणा शहराच्या पश्चिमेला उगम पावते. पैनगंगा नदी सेनगाव तालुक्यात जिल्ह्याला स्पर्श करून यवतमाळ जिल्ह्याकडे वाहत जाते. नागमोडी वळण हे या नदीचे वैशिष्ट्ये आहे. याच नदीवर इसापूर धरणाची निर्मिती करण्यात आली आहे. कयाधू ही पैनगंगेची मुख्य उपनदी आहे. जिल्ह्यासाठी ही जीवन वाहिनी आहे. रिसोड जवळच्या डोंगरातून उगम पावली आहे. जिल्ह्यातील ५०.५० कि.मी. एवढी नदीची लांबी आहे. कयाधू ही हंगामी आहे. उन्हाळयात कोरडी असते. याच नदीवर सापळी धरण बांधणे चालू आहे. पूर्णा नदी जिल्ह्यातून वाहते. हिचा उगम अजिंठाच्या डोंगर रांगात झाला आहे. ही नदी जालना जिल्ह्यातून हिंगोली जिल्ह्यात प्रवेश करते. १०० कि.मी. अंतरावर सिद्धेश्वर धरण बांधले आहे. पूर्णा नदीवर बांधण्यात आलेला पूर्णा (येलधरी) प्रकल्प हा मराठवाड्यातील पहिला जलसिंचन व जलविद्युत प्रकल्प आहे. पैनगंगा खोऱ्यातील बराचसा भाग शेताखाली आहे.

पर्जन्यमान

हिंगोली जिल्हा हा खात्रीचा पाऊस पडणाऱ्या प्रदेशात समाविष्ठ आहे. अलिकडीलच्या काळात जनू ते डिसेंबर या कालावधीत नैऋत्य मान्सून वाऱ्यापासून ८२४.३९ मि.मि. पाऊस पडतो. याशिवाय ऑक्टोबर ते नोव्हेंबर अखेरपर्यंत ईशान्य मान्सून वाऱ्यापासून सर्वसाधारणपणे १०२ मि.मि. पाऊस पडतो. जिल्ह्यात सर्व भागात सारखा पाऊस पडत नाही. पश्चिमेकडून पूर्वेकडे पावसाचे प्रमाण वाढत जाते.

मृदा

हिंगोली जिल्ह्यांचा समावेश बेसॉल्टीक खडकजन्य भू-प्रदेशात होतो. जिल्ह्यातील जमीन चूनखडी, मॅग्नेशिअम, लोह, अल्कली अशा पोषक द्रव्यांनी भरलेली आहे. जिल्ह्यात मातीमध्ये वेगवेगळया भागात थोडी तफावत आढळते. खडकळ, माध्यम, काळी आणि चोपणी असे प्रकार अस्तित्वा आहेत. खरबड जमीन डोंबर उतारावर असल्यामुळे पाण्याचा निचरा लवकर होतो.

सखल भागात मध्यम व काळी माती आहे. ती ओलावा धरते. त्यामुळे ती सुपीक आहे. ओढ्याच्या काठी चोपणी जमीन आहे. तीची लवकर धूप होते. या ठिकाणी मृदसंधारणाच्या कामाला बराच वाव आहे.

लोकसंख्या

सन २०११ च्या जनगणनेनुसार हिंगोली जिल्ह्याची लोकसंख्या ११,७७,३४५ इतकी आहे. त्यापैकी ६,०६,२९४ पुरुष तर ५,७१,०५१ स्त्रिया आहेत. एकूण लोकसंख्येची टक्केवारी अनुक्रमे ५१.४९ व ४८.५० एवढी आहे.

सारणी क्र. १

हिंगोली जिल्ह्यातील तालुकानिहाय लोकसंख्येची टक्केवारीचा तक्ता

| अ. क्र. | तालुके | लोकसंख्या टक्केवारीमध्ये |
|---|---|---|
| १ | हिंगोली | २२.८९% |
| २ | कळमनूरी | १९.६७% |
| ३ | वसमत | २४.७१% |
| ४ | सेनगाव | १७.३४% |
| ५ | औंढा नागनाथ | १५.३९% |
| | एकूण | १००.००% |

वरील तक्ता व स्तंभालेखावरून तालुकानिहाय लोकसंख्येचा विचार करता असे निदर्शनास येते की, सर्वात जास्त लोकसंख्या २४.७१% वसमत तालुक्यात वसलेली आहे. तर सर्वात कमी लोकसंख्या १५.३९% औंढा नागनाथ तालुक्यात वसलेली आहे. हिंगोली जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ८४.८१% लोक ग्रामीण भागात राहतात तर १५.१९% लोक शहरी भागात रहातात.

तालुकानिहाय लोकसंख्येची घनता

'दर चौरस किलोमिटरमध्ये वास्तव्य करणाऱ्या लोकांची संख्या म्हणजे लोकसंख्येची घनता होय.' हिंगोली जिल्ह्यातील तालुकानिहाय लोकसंख्येची घनता पुढील सारणीत दर्शविलेली आहे.

सारणी क्र.२

हिंगोली जिल्ह्यातील तालुका निहाय लोकसंख्येची घनतेचे तक्ता

| अ. क्र. | तालुके | लोकसंख्येची घनता |
|---|---|---|
| १ | हिंगोली | १८१ |
| २ | सेनगाव | १९३ |
| ३ | औंढा नागनाथ | २१६ |
| ४ | कळमनूरी | २२२ |
| ५ | वसमत | २४३ |
| | एकूण | २११ |

वरील तक्ता व वर्तुळावरून असे स्पष्ट होते की, हिंगोली जिल्ह्याची लोकसंख्येची घनता २४४ एवढी आहे. तालुकानिहाय वसमत तालुक्याची लोकसंख्येची घनता २४३ सर्वाधिक आहे. तर सर्वात कमी लोकसंख्येची घनता १८१ सेनगाव तालुक्याची आहे.

निष्कर्ष :-

1. हिंगोली जिल्ह्यातील भौगोलिक घटकांचा अभ्यास केल्यानंतर तेथील हवामान उष्ण व कोरडे स्वरूपाचे असून रेगुर व काही प्रमाणात चुनखडी प्रकारची मृदा दिसून येते.
2. कयाधू आणि पूर्णा नदीच्या पात्रामुळे हिंगोली जिल्ह्यातील बहुतांष भागात सिंचन क्षेत्राचा विकास होण्यास मदत झाली आहे.

3. जनू ते डिसेंबर या कालावधीत नैऋत्य मान्सून वाऱ्यापासून ८२४.३९ मि.मि. तर ऑक्टोबर ते नोव्हेंबर अखेरपर्यंत ईशान्य मान्सून वाऱ्यापासून सर्वसाधारणपणे १०२ मि.मि. पाऊस जिल्ह्यात पडतो.
4. नामदेवाची जन्मस्थान, नाथपंथाचे गुरू गोरखनाथ, गहिनीनाथ व महानुभाव पंथाच्या चक्रधर स्वामी, संत नामदेवाचे गुरू श्री विसोबा खेचर, भास्कर भट्ट, त्रिविक्रम, निंबराज, राजशेखर आदि संतकवी व महात्म्याचा वारसा जिल्ह्याला लाभलेला दिसून येतो.
5. हिंगोली जिल्ह्याची लोकसंख्येची घनता २४४ एवढी असून वसमत तालुक्याची लोकसंख्येची घनता २४३ सर्वाधिक आहे. तर सर्वात कमी १८१ सेनगाव तालुक्याची आहे.
6. सर्वात जास्त लोकसंख्या २४.७१% वसमत तालुक्यात आहे तर सर्वात कमी लोकसंख्या १५.३९% औंढा नागनाथ तालुक्यात आहे.

**संदर्भग्रंथ :-**


1. हिंगोली जिल्हा आर्थिक आणि सामाजिक समालोचन, २०१३
2. जनगणना २०११ जिल्हा धिकारी कार्यालय, हिंगोली
3. जनगणना - २०११; (२) हिंगोली जिल्हा आर्थिक आणि सामाजिक समालोचन २०१३
4. हिंगोली जिल्हा आर्थिक आणि सामाजिक समालोचन २०१३
5. www.wikipedia.org